प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

05 नोव्हेंबर, 2015

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद हयांना दिलेल्या सूचनांना, आरबीआयने फेब्रुवारी 03, 2016 पर्यंत मुदतवाढ**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद हयांना आरबीआयने दिलेल्या सूचनांना, नोव्हेंबर 4, 2015 पासून फेब्रुवारी 03, 2016 पर्यंतची मुदतवाढ, तीन महिन्यांसाठी, पुनरावलोकनाच्या अटीवर देण्यात आली आहे. हयां बँकेला मे 2012 पासून सूचनांखाली ठेवले होते. हयापूर्वीही हया सूचनांना, सहा वेळा, प्रत्येकी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती.
बँकिंग विनियम अधिनियम, 1949 (एएसीएस) च्या कलम 35अ च्या पोट कलम (1) खाली रिझर्व बँकेला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन हया सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली होती. जनतेच्या माहितीसाठी, हया सूचनांची एक प्रत बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

रिझर्व बँकेने दिलेल्या हया सूचनांचा अर्थ, हया बँकेचा परवाना रिझर्व बँकेने रद्द केला आहे असा समजला जाऊ नये. बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारेपर्यंत, ही बँक, निर्बंधांसह, बँकिंग व्यवहार करणे सुरु ठेवू शकते. परिस्थितीवर अवलंबून हया सूचनांमध्ये बदल करण्याचा विचारही रिझर्व बँक करु शकते.

**अजित प्रसाद**
सहाय्यक महाव्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/1090**